तात्काळ: ५६९७
======

जा.क्र. माध्य-३/ ९३ /अमाशा/पुवि/२०००-०१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 20 APR 2001

प्रति,
सचिव,
ज्ञानपंथ महिला शिक्षण
आणि उद्योग सोसायटी
भोईरनगर
ता. हवेली

विषय : २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १] शासनपत्र क्र. नम शा/१०००/४२०/२०००/अ माशि-१ दि. / २००१ / २००९ / माशि-९
२] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/१०२ के/नमाशा/६५१७० १५क, दिनांक २८.९.२०००

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यांत येते की, खाली दिलेल्या शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान/विनाअनुदान तत्वावरनविन माध्यमिक शाळा सुरु करण्यांस परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधिन आहे.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | ज्ञानपंथ महिला शिक्षण आणि उद्योग सोसायटी भोईरनगर ता. हवेली | भोईरनगर चिंचवड पुणे ३३ | ५वी | मराठी |

१अ] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकाळांत शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यांत येणार नाही किंवा विद्यार्थ्यांच्या फी च्या प्रतिपूर्तीची मागणी करण्यांत येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र सादर करावे.

१ब] या नविन माध्यमिक शाळांना शासनाने कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यांत आली असून भविष्यांत कधिही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यांत येणार नाही.

१क] या नविन माध्यमिक शाळांना शासनाने विहित केलेल्या सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय राहील.

२] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे [उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३] सदर माध्यमिक संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

५] संस्था विरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

६] सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

७] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालक असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यांत घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबीत नाही.

८] सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयांत दावा चालू नाही.

....२.....

सदर पत्र प्राप्त होताच वरिल [१ ते ८] विहित बाबींची पुर्तता केली असल्याचे संस्थेने ७ दिवसाचे आंत शिक्षण अधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद, यांना कळवावे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

स्वाक्षरित शि. उ. सं. यांची
सही आहे

प्रत: माहिती व कार्यवाहीसाठी
१] शिक्षण अधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद, सातारा पुणे
वरिल संदर्भात नमूद केलेल्या पत्रानुसार कळविण्यांत येते की, संस्थेने विहित बाबींची पुर्तता केली असल्याची माहिती वरुर त्या कागदपत्रांची खात्री करुन अभिप्रायांसह या कार्यालयाकडे तीन दिवसांत पाठवावी.

प्रत:
२] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर
३0] मा. अवर सचिव,
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना सविनय सादर.
४] निवड नस्ती केन्द्र कार्यालय